कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२४–२५/१०२४
दि. ०७/०८/ २०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

**<u>कला अकादमीची महिला कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.१३ ऑगस्ट रोजी</u>**

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती महिला कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा मंगळवार दि.१३ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २.३० वाजल्यापासून कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील चार केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण आठ पथके सहभागी होणार आहेत.

**त्यात श्री नागेश महारुद्र भजनी मंडळ, कुडका–तिसवाडी, संगीत शारदा विद्यालय मंदिर, धाकटे भाट, डोंगरी–तिसवाडी, श्री महादेव भुमिका घवनाळेश्वर महिला भजनी मंडळ, साळ–डिचोली, श्री शांतादुर्गा भजनी मंडळ, कारापूर–साखळी, श्री केळबाय सातेरी महिला भजनी मंडळ, कुर्टी–फोंडा, श्री मदनंत सातेरी खामिणी महिला भजनी मंडळ, सावई–वेरे–फोंडा, श्री राम सेवा संघ महिला भजनी मंडळ, मयडे–बार्देश व श्री साई दिगंबर महिला भजनी मंडळ, आसगांव–बार्देश या पथकांचा समावेश आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा–या आठही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १३ ऑगस्ट २०२४ रोजी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर कला अकादमी, पणजी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा–या आठही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

विभागीय व राज्यस्तरीय महिला कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ५.३० वाजता होणार आहे. याची सर्व विजेत्या पथकांनी व कलाकारांनी नोंद घ्यावी.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी आपली उपस्थिती लावून स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसएस